आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'च्या निधी हस्तांतरणाला पुण्यात औपचारिक प्रारंभ, यासाठी वर्षभराची आर्थिक तरतूद केल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

- कोलकातामधल्या डॉक्टरवरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ डॉक्टरांची राज्यात ठिकठिकाणी निदर्शनं, आरोग्यसेवा प्रभावित

- डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजनासंदर्भात समिती स्थापन करण्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं आश्वासन

**आणि**

- नाशिकमध्ये काल झालेल्या हिंसाचार प्रकरणी २० जण अटकेत, जनजीवन पूर्वपदावर

**<><><><><>**

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'साठी वर्षभराची आर्थिक तरतूद केलेली आहे. महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून त्यांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी हात आखडता घेणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत निधी हस्तांतरणाची औपचारिक सुरुवात करण्यासाठी पुण्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल, असंही ते म्हणाले. बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार आहे. या योजनेसाठी दरवर्षी अर्थसंकल्पातही तरतूद केली जाणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भगिनींच्या बँक खात्यात जमा झाले आहेत, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. या योजनेद्वारे २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचं महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं.

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक विजेत्या स्वप्नील कुसळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जिल्हास्तरीय औपचारिक लाभ हस्तांतरणही आज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालं. यावेळी विविध मंत्री उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्य सरकारनं महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना आणल्या आहेत. त्यामुळं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राज्यातल्या बचतगट चळवळीतल्या उमेद अभियानातल्या महिला ४० हजार गावांतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक कोटी राख्या पाठविणार आहेत.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर बलात्कार आणि तिची हत्या झाल्याच्या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला आहे.

राज्याच्या विविध भागात डॉक्टर संघटनेनं संपाला प्रतिसाद दिला असून सामान्य रुग्णालयात रुग्णसेवा बंद आहेत. मुंबईत जे.जे. रुग्णालयासह अन्य रुग्णालयांचे डॉक्टर आणि वैद्यकीय संघटना या संपात सहभागी झाल्या आहेत.

**पुण्यातल्या** ससून रुग्णालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनीही यात सहभाग घेतला. यामुळं बाह्य रुग्ण विभागातल्या रुग्णांची संख्या कमी झाली तसंच शस्त्रक्रियांच्या संख्येतही घट झाली. अत्यावश्यक विभागातली सेवा, अत्यावश्यक शस्त्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.

**छत्रपती संभाजीनगर** इथंही क्रांतिचौकात निदर्शनं झाली. शहरातील काही खासगी वैद्यकीय रुग्णालयं, वैद्यकीय व्यावसायिक आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टरांची मार्ड संघटना या संपात सहभागी झाली आहे.

**हिंगोलीत** डॉक्टर हेडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ आणि दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तर धुळ्यात श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी ठिय्या आंदोलन केलं. **नांदेड** जिल्ह्यात निमा, मार्ड आदी संघटनांच्या वतीने आज निषेध मोर्चा काढण्यात आला.

**भंडारा, यवतमाळमध्ये** डॉक्टरांच्या विविध संघटनांनी मूकमोर्चा काढला. **नागपूर** इथंही इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीनं आज निषेध आंदोलन करण्यात आलं. **बुलढाणा** जिल्ह्यात ठिकठिकाणी या घटनेचा निषेध करण्यात आला.

**<><><><><>**

डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजनासंदर्भात एक समिती स्थापन करण्याचं आश्वासन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिलं आहे. डॉक्टरांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आज नवी दिल्लीत मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी हे आश्वासन दिलं. या समितीमध्ये डॉक्टरांचे प्रतिनिधी, राज्य सरकार यांचेही प्रतिनिधी असतील. डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी २६ राज्यात कायदे मंजूर झालेले आहेत. डॉक्टरांनी आंदोलन मागे घेऊन कामावर रुजू व्हावं, असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

पुण्यात लेसर बीम वर आगामी गणेशोत्सव काळात पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय पोलीस विभागानं नुकताच जाहीर केला. दहीहंडी उत्सवाच्या काळात सुद्धा लेसर बीमवर बंदी घालण्याची मागणी पुणेकर नागरिकांनी केली आहे.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या पुरंदरच्या जीआय मानांकित अंजिरांपासून तयार करण्यात आलेला अंजिराचा रस नुकताच पोलंडला निर्यात करण्यात आला. देशातून निर्यात होणारं

पहिलंच हे रेडी टू ड्रिंक पेय आहे. अपेडा अर्थात कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने ही निर्यात केली आहे. पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनीने हा रस तयार केला आहे.

<><><><><>

बांगलादेशात सुरू असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आयोजित बंद दरम्यान नाशिकमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणी सहा गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणात आज २० जणांना अटक करण्यात आली तर उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. आज परिस्थिती नियंत्रणात असून हिंसाचारासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरोधात शासन कडक कारवाई करेल, अशी माहिती पालकमंत्री दादा भुसे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. या घटनेत पाच पोलीस अधिकारी आणि ९ कर्मचारी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी ठिकठिकाणचं सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आलं असून तपास सुरू केला आहे, असंही मंत्री भुसे यांनी सांगितलं.

**नाशिकमध्ये** काल उसळलेल्या हिंसाचारानंतर आज मात्र जनजीवन पूर्वपदावर आलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब साठी संयुक्त चाळणी परीक्षेचं उद्या १८ ऑगस्टला तर, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ या परीक्षेचं आयोजन येत्या २५ तारखेला करण्यात आले आहे. याचवेळी IBPS ने देशपातळीवर परीक्षा आयोजित केल्या आहेत. त्यामुळं MPSC नं परीक्षाच्या तारखा बदलाव्या अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागू, असा इशारा काँग्रेसनं दिला आहे.

<><><><><>

म्हाडाच्या ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेनं अर्ज सादर करता यावा, यासाठी म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळातर्फे येत्या १९ ऑगस्ट ला दुपारी बारा वाजता ‘लाईव्ह वेबिनार’ आयोजित करण्यात आला आहे. मुंबईतल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांतल्या दोन हजार तीस सदनिकांच्या विक्रीसाठी यंदा

नऊ ऑगस्ट पासून म्हाडाचं संकेतस्थळ आणि मोबाइल ॲपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी आणि अर्ज स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

<><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात काल 'एक लाख वृक्ष लागवड' उपक्रमाचा आरंभ झाला. कुलगुरू प्राध्यापक प्रकाश महानवर यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं. यावेळी विद्यापीठातले विविध अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी आदी उपस्थित असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

<><><><>

राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र शासनातर्फे दिले जाणारे कृषी आणि अकृषी विद्यापीठांसाठीचे राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी चे संचालक, प्राध्यापक डाॅ. महावीरसिंग चौहान यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक म्हणून तर महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून २०२२-२३ या वर्षीचे राज्य पुरस्कार जाहीर झाले.

<><><><>

मुंबई विमानतळावर अवैधरित्या साडे ४ किलो सोनं घेऊन आलेल्या दोघांना महसूल गुप्तचर संचालनालयानं अटक केली. या सोन्याची किंमत ३ कोटी ३३ लाख रुपये आहे. अबू धाबीहून हे दोघे प्रवासी आले होते.

<><><><>

नांदेड पोलीस परिक्षेत्रातल्या नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चार जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्ट दरम्यान अवैध धंदे चालकांविरुद्ध १ हजार १६३ गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या अंतर्गत हातभट्टीचालक, दारू विक्रेते, गुटखा, जुगार चालक,अवैध वाळू माफिया यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><>

मराठवाड्यात काल अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**बीड** जिल्ह्यातल्या पाटोदा महसूल मंडळात काल मध्यरात्री पासून मुसळधार पाऊस पडत असून मांजरा नदीला महापूर आला आहे.  पाटोदा, पारगाव, अनपटवाडी या नदीकाठच्या गावांना महापुराचा मोठा फटका बसला असून शेकडो एकर जमिनीवरची पिकं पाण्याखाली गेली असल्याचं  आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या तीसपैकी नऊ मंडळात गेल्या २४ तासात अतिवृष्टीची नोंद झाली असून, काल पहाटे मेघगर्जनेसह झालेल्या जोरदार पावसामुळं हिंगोली शहरालगत असलेल्या कयाधू नदीला पूर आला आहे.

**लातूर** जिल्ह्यातही काल मुसळधार पाऊस झाला. जळकोट तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे शेती पिकांचं मोठं नुकसान झालं तर चाकूरसह तालुक्यातल्या महाळंगी परिसरात नागरिकांच्या घरात पाणी घुसल्यानं संसारोपयोगी साहित्य आणि शेतीपिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

छत्रपती संभाजीनगरसह **जालना** जिल्ह्यातही आज पहाटेपासून ढगाळ वातावरण असून संततधार पाऊस सुरु आहे.

**सातारा** शहरासह जिल्ह्यातल्या विविध भागात आज विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.

**<><><><><>**

राज्यात गेल्या २४ तासांत मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पावसाची नोंद झाली. विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. उद्या कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**